समरी खटला क्र.१२०९/२०२३

**मे. अ.ज.गिन्हे, न्यायदंडाधिकारी वर्ग–१, (न्यायालय क्र.२) तथा पॅनल प्रमुख, पॅनल क्र.८, राष्ट्रीय लोक आदालत, बारामती यांचे न्यायालयात.**

## आरोपा सारांशचा

| | | | |
|---|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याची तारीख | – | ०५.१२.२०२२ |
| २. | गुन्हा घडल्याची वेळ | – | ११.१५ वा. |
| ३. | गुन्हा घडल्याचे ठिकाण | – | बारामती शहर पोलीस स्टेशन, जि. पुणे. |
| ४. | तक्रार दिल्याची तारीख | – | ०५.१२.२०२२ |
| ५. | तक्रारदाराचे नांव, वय व पत्ता | – | **महाराष्ट्र सरकार** |
| ६. | आरोपीचे नांव, वय व पत्ता | – | **दत्तात्रय नारायण जाधव**, वयः – वर्ष, रा.माळावरची देवी शेजारी, गौतम बाग, बारामती, ता.बारामती, जि.पुणे. |
| ७. | फिर्याद ज्या कलमाखाली दिली ते | – | मो.वा.का.कलम ४/१२२, १७७अ अन्वये |

## गुन्ह्याचा तपशील

तुम्ही दि.०५.१२.२०२२ रोजी ११.१५ वाजताचे सुमारास मौजे बारामती गावचे हद्दीत तुमच्या ताब्यातील वाहन क्र.एम.एच.४२/ए.झेड.८२७५ ही रॉग साईड चालवून नियमांचा भंग करुन तुमचेविरुध्द ई–चलन send to Court प्रमाणे दंडाची पावती देऊन १५ दिवसाचे मुदतीत भरावी अन्यथा तुमचेवर कारवाई केली जाईल तरी देखील सदर रक्कम न भरल्यामुळे तुम्ही मोटार वाहन कायदा कलम ४/१२२, १७७ अ प्रमाणेचा गुन्हा या न्यायालयाचे स्थळसिमेत केला आहे. सदर दोषारोपाचे अनुषंगाने या न्यायालयातर्फे तुमच्याविरुध्द खटला चालविणेत येत आहे व त्या बाबतचे निर्देष मी याद्वारे तुम्हास देत आहे.

८. **आरोपीचा जबाब.**

**प्रश्न क्र.१.** – तुम्हाला आता तुमच्यावर ठेवणेत आलेल्या वरील आरोपाचा सारांश मराठीत वाचून दाखविण्यात आला. तो तुम्हाला समजला का ?

**उत्तरः–** **होय.**

**प्रश्न क्र.२.** – तुम्हाला दोषारोपपत्राची प्रत मिळाली काय ?

**उत्तरः–** **होय.**

**प्रश्न क्र.३.** –  तुम्हाला गुन्हा कबुल आहे का ?

**उत्तरः–  होय, मला गुन्हा कबूल आहे.**

................................

**आरोपीची स्वाक्षरी/ अंगठा**

**समक्ष**

GIRHE ANNASAHEB JAGANNATH

Digitally signed by GIRHE ANNASAHEB JAGANNATH
Date: 2023.09.09 14:57:53 +0530

(अ.ज.गिऱ्हे)

दिनांकः ०९.०९.२०२३ — पॅनल प्रमुख, पॅनल क्र.८,

ठिकाणः बारामती. — राष्ट्रीय लोक आदालत, बारामती.

## न्यायनिर्णय

आरोपीने गुन्हा कबूल केलेला आहे. आरोपीची कबूली स्वेच्छेने आहे, त्यामुळे ती मी स्विकारत आहे. आरोपीचे असे कथन आहे की, तो कुटूंबाचा कर्ता असून कुटूंब त्याच्यावर अवलंबून आहे. त्यामुळे, कमीत–कमी दंड करण्यात यावा. आरोपीचे सदर कथन विचारात घेता आरोपीला मोटार वाहन कायदा कलम ४/१२२, १७७ अ अन्वये दोषी धरुन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

| **आदेश** | |
|---|---|
| **१.** | आरोपीस मोटार वाहन कायदा कलम ४/१२२, १७७ अ अन्वयेच्या अपराधाखाली दोषी धरण्यात येत असून त्यास फौ.प्र.सं.कलम २५२ नुसार कोर्ट उठेपावेतो कैदेची व रक्कम रुपये २००/– (अक्षरी दोनशे रुपये केवळ) दंड भरण्याची व दंड न भरल्यास २ दिवस साधी कैदेची शिक्षा देण्यात येत आहे. |
| **२.** | न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला. |
| दिनांकः ०९.०९.२०२३<br>ठिकाणः बारामती. | (अ.ज.गिऱ्हे)<br>पॅनल प्रमुख, पॅनल क्र.८,<br>राष्ट्रीय लोक आदालत, बारामती. |

**प्रमाणपत्र**

*मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.*

| | |
|---|---|
| *लघुलेखकाचे नाव* | *महेश शरद भावसार, श्रेणी–३* |
| *न्यायालयाचे नाव* | *श्री. अ. ज. गिऱ्हे,*<br>*२रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर व न्यायदंडाधिकारी वर्ग–१ तथा पॅनल प्रमुख, पॅनल क्र.८, राष्ट्रीय लोकआदालत, बारामती.* |
| *न्यायनिर्णयाची तारिख* | *०९.०९.२०२३* |
| *न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख* | *०९.०९.२०२३* |
| *न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख* | *०९.०९.२०२३* |